# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

**दिनांक २२.०९.२०२६ मंगळवार**

**पोलीस मुख्यालय, अलंकार सभागृह येथे गुन्हेगारांचा आदान—प्रदान कार्यक्रम संपन्न :—**

दिनांक २२.०९.२०२६ चे ११.०० वा. मा. पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील यांचे संकल्पनेतुन व मार्गदर्शनाने नागपूर पोलीस आयुक्तालय अंतर्गत विविध पोलीस ठाणे येथे अटक व मा. न्यायालयाकडून पोलीस कोठडी प्राप्त असणारे एकूण ०८ अटक आरोपींचे आदान—प्रदान हे पोलीस मुख्यालय, नागपुर शहर येथील अलंकार सभागृह येथे पार पडले. आदान—प्रदान कार्यक्रमाचा मुळ उद्येश हा पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आरोपींची ओळख पटावी, आरोपींची गुन्हे पध्दती समजण्यास मदत व्हावी तसेच, त्याचेवर कोणकोणते, किती व कुठे गुन्हे दाखल आहेत याबाबत माहितीचे आदान—प्रदान सुलभ रितीने करता यावे असा होता. कार्यक्रम प्रसंगी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा. श्री. दीपक अग्रवाल पोलीस उपआयुक्त (डिटेक्शन) व मा. श्री. वैभव जाधव, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा), श्री. आनंद बिचेवार (पोनि. भुमाफीया पथक) हे उपस्थित होते. तसेच, एकूण २२ पोलीस ठाणे येथील अधिकारी व अंमलदार आणि आरोपींना अटक करणारे व हजर आणणारे संबंधीत पोलीस ठाणेंचे ठाणेदार, तपास पथक व एमओबी पथकातील अधिकारी व अंमलदार हजर होते. दिनांक १४.०७.२०२६ पासुन आजपावेतो एकूण १९१ अटक आरोपीतांना आदान—प्रदान मोहीमेकरीता हजर करण्यात आलेले आहे.

कार्यक्रम प्रसंगी मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी सीसीसी द्वारे चालणारी कार्यपध्दती त्याचप्रमाणे सिम्बा ॲप प्रणाली समजून घेवुन, हजर आरोपींची इत्यंभुत माहिती सिंबा प्रणालीमध्ये वेळीच अद्ययावत करण्याबाबत, त्याचप्रमाणे आरोपींचा डोजीअर फार्म, फिंगरप्रिंटस्, मोडस ऑपरेंडी याबाबत माहिती प्राप्त करुन संकलित करावी. अटक आरोपीतांवर योग्य त्या प्रतिबंधक कार्यवाही कराव्यात अशा हजर ठाणे प्रभारी व तपासी अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या.

**(कामगिरी)**

**एस्कॉर्ट पथकाची कामगीरी :— जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २१.०९.२०२६ चे १५.३० वा. चे सुमारास एस्कॉर्ट पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना माहिती मिळाली की, पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीत, गोकुळपेठ मार्केट येथे एका झोपडीचे आडोशाला काही ईसम हे आकडे लावून सट्टापट्टीचा जुगार खेळत व खेळवित आहेत. अशा माहीतीवरून अंबाझरी पोलीसांसह पंचासमक्ष नमुद ठिकाणी रेड कार्यवाही केली असता, तेथे पोलीसांना पाहून जुगार खेळणारे इसम पळून गेले. तसेच, जुगार खेळविणारे ३ इसम नामे आरोपी १) जितेंद्र महादेव वागाडे, वय ३९ वर्षे, रा. इंदीरा गांधी नगर, ईमामवाडा २) संतोष महादेव वागाडे, वय ३० वर्षे, ३) सागर रमेश गवई, वय २९ वर्षे, दोन्ही रा. पांढराबोडी पोलीस चौकीजवळ, अंबाझरी, नागपुर हे आकडेपट्टीवर सट्टयाचे आकडे लिहतांना समक्ष मिळुन आले. त्यांचे ताब्यातुन रोख, वेगवेगळे कंपनीचे ०३ मोबाईल व जुगाराचे ईतर साहीत्य असा एकुण ५१,६५०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलीस ठाणे अंबाझरी येथे आरोपींविरूध्द कलम १२(अ) म.

जु.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आरोपींना मुद्येमालासह पुढील कार्यवाहीस्तव अंबाझरी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी एस्कॉर्ट पथकाचे प्रमुख सपोनि. भगवान कोळी, मसपोनि. श्रीमती शारदा भोपळे, पोहवा. विजय गिरी, ओमप्रकाश खंडाते, पोअं. आशिष गायधने, चंद्रकांत मेहेत्रे यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे नवीन कामठी :— दरोड्याचे प्रयत्नातील आरोपींना अटक.</u>**

दिनांक २२.०९.२०२६ चे ०४.०० वा. चे सुमारास, नविन कामठी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, नेरी उनगांव रोड जवळील शेत शिवारातील झाडा—झुडपात काही ईसम शस्त्रासह घातपात करण्याच्या उद्देशाने जमलेले आहेत. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, पोलीसांनी नमुद ठिकाणी जावुन, तेथे घेराव टाकुन, दरोड्याचे तयारीतील ०३ इसमांना ताब्यात घेतले व ०२ ईसम अंधाराचा फायदा घेवुन पळुन गेले. ताब्यातील ईसमांना त्यांचे नांव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नांव १) नितेश मुलचंद लोंढे, वय २७ वर्षे, ०२) विक्की दीपक शेंडे, वय ३४ वर्षे, ०३) सुजित चमन लोंढे, वय ३८ वर्षे, सर्व रा. सवापुर, कन्हान, ता. पारशिवनी, जि. नागपूर असे सांगीतले. पंचासमक्ष त्यांचे ताब्यातुन एक लोखंडी धारदार विळा, एक लाकडी दांडा असलेली कुऱ्हाड, लोखंडी सळाख, मिरची पावडर, दोरी, हिरो कंपनीची दुचाकी क्र. एम.एच. ४० डीएच १२७३ व ०२ मोबाईल फोन असा एकुण किंमती अंदाजे १,१३,१५०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यांना त्यांचे पळुन गेलेल्या साथीदारांचे नावे विचारली असता, त्यांनी कोणतीही माहिती दिली नाही. आरोपी हे घातक शस्त्रासह दरोडा टाकण्याचे तयारीत असतांना, समक्ष मिळुन आल्याने फिर्यादी पोअं. धर्मपाल सहारे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नवीन कामठी येथे पोउपनि. योगेश नाल्टे यांनी आरोपीविरूध्द कलम ३१०(४),३१०(५) भा.न्या.सं., सहकलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, ०३ आरोपींना अटक केलेली आहे. पाहीजे आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे पारडी :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक २१.०९.२०२६ चे २१.२० वा. चे सुमारास, फिर्यादी सोबत राहणारा व काम करणारा नातेवाईक नामे प्रदुम्नसिंग हरीलालसिंग, वय २६ वर्ष, रा. बेलीहान, पलिया रोड, जि. लखिमपुर (उत्तरप्रदेश), ह.मु.— सीएम कोल्ड स्टोरेज, धारगाव, कळमणा, नागपूर हा इलेक्ट्रीक मोपेड गाडी क्र. एम.एच ३१—४१५९ ने पोलीस ठाणे पारडी हद्दीत, नागपूर—जबलपुर हायवे कटींग जवळील रोड, पगारिया बिल्डींगचे डावे बाजुला, कोल डेपोचे अलिकडून जात असता, कोणीतरी अज्ञात चारचाकी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन, फिर्यादीचे नातेवाईकाचे मोपेडला धडक देवुन, त्यास गंभीर जखमी करुन, घटनास्थळावरुन जखमीस कोणतीही मदत न करता पळुन गेला. गंभीर जखमी यास उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यास तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी पवनसिंग राजुसिंग चौहान, वय २५ वर्ष, रा. खुरवल, पोस्ट सदरपुर, ता. महमुदाबाद, जि. सितापुर (उत्तरप्रदेश), ह.मु.–सीएम कोल्ड स्टोरेज, धारगाव, कळमणा, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पारडी येथे अज्ञात वाहन चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१),२८१ भा.न्या.सं., सहकलम १३४, १७७, १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे एमआयडीसी :– प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादीचे जावई नामे एजाजोद्दीन अमानुद्दीन काजी, वय ४० वर्ष, रा. बाबा बगदादी नगर, झिंगाबाई टाकळी, नागपूर हे फायब्रोमॅक्स कंपनी येथे काम करतात. दिनांक २२.०९.२०२६ चे ०९.३० वा. चे सुमारास, ते त्यांचे मोटार सायकल क्र. एम.एच ४० ए.एन ९९७१ ने पोलीस ठाणे एमआयडीसी हद्‌दीत, सेंट्रल एमआयडीसी रोडने महेंद्र शोरुम समोरून कामावर जात असता, कोणीतरी अज्ञात वाहन वाहनाचे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन, फिर्यादीचे जावयाचे मोटारसायकला धडक देवुन, त्यांना गंभीर जखमी करुन, घटनास्थळावरुन जखमीस कोणतीही मदत न करता पळुन गेला. लोकांनी गंभीर जखमी यांना उपचाराकरीता लता मंगेशकर हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

यांप्रकरणी फिर्यादी एहफाज अफझल खान, वय ३८ वर्ष, रा. प्लॉट क्र. ६, पेंशन नगर, पोलीस लाईन टाकळी, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे पोउपनि. सागर गायकवाड यांनी अज्ञात वाहन चालकाविरूध्द कलम १०६(१),२८१ भा.न्या.सं., सहकलम १३४, १७७, १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**४) पोलीस ठाणे कळमणा :– घरफोडी करणाऱ्या आरोपीविरुध्द गुन्हा दाखल.**

पोलीस ठाणे कळमणा हद्दीत, प्लॉट क्र. ८९/१, पाण्याचे टाकीजवळ, नेताजी नगर येथे राहणारे फिर्यादी किशोर मोरेश्वर म्हस्के, वय ५६ वर्षे हे शाळेमध्ये कारकुन आहेत. दिनांक २१.०९.२०२६ चे ११.३० ते १६.१५ वा. चे दरम्यान, फिर्यादी व त्यांच्या पत्नी हे आपले राहते घराला कुलुप लावून दोघेही ड्युटीवर गेले असता, कोणीतरी अज्ञात आरोपीने, त्यांचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलुप तोडून, आत प्रवेश करुन, घरातील बेडरूममधील लोखंडी व लाकडी कपाट तोडून, त्यातील रोख ३०,०००/–रू. व सोन्या–चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण ४,०४,०००/–रू. चा मुद्देमाल चोरुन नेला.

यांप्रकरणी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे कळमणा येथे पोउपनि. अजय गर्जे ९८२३५६४४१५ यांनी अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३०५(अ),३३१(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरु आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे हुडकेश्वर :–** फिर्यादी अशोक रामभाऊ शेंडे, वय ५३ वर्षे, रा. प्लॉट क्र. २८/अ, संजय गांधी नगर, भोले बाबा मंदीर जवळ, पिपळा रोड, हुडकेश्वर, नागपूर यांनी पोलीस ठाण हुडकेश्वर येथे तक्रार दिली की, त्यांची भाची नामे सौ. कविता विजय बावणे, वय ३२ वर्षे, रा. तिष्टी, पोस्ट तेलगाव, ता. कळमेश्वर, जि. नागपूर ह्या दिनांक १६.०९.२०२६ चे ११.०० वा. पासुन पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्‌दीतील म्हाळगीनगर चौक येथून बेपत्ता झाल्या आहेत. त्यांचा शोध घेतला असता, मिळून आल्या नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांना फुस लावून पळवून नेले असावे. **वर्णन** रंग–सावळा, चेहरा–गोल, बांधा–मजबुत, उंची–५ फुट ४ इंच, केस–काळे लांब, अंगात– जांभळ्या रंगाची साडी व लाल ब्लाऊज घातलेले आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात. फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**२) पोलीस ठाणे हुडकेश्वर :—** फिर्यादी गजानन बळीरामजी थोटे, वय ६४ वर्षे, रा. प्लॉट क्र. २४२, गल्ली क्र. २, जवाहर नगर, मानेवाडा रोड, हुडकेश्वर, नागपूर यांनी पोलीस ठाण हुडकेश्वर येथे तक्रार दिली की, त्यांची मुलगी नामे श्रीमती स्वाती विनोद कोल्हे, वय ३६ वर्षे ह्या दिनांक १६.०९.२०२६ चे २१.३० वा. पासुन पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील राहते घरुन बेपत्ता झाल्या आहेत. त्यांचा शोध घेतला असता, मिळून आल्या नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांना फुस लावून पळवून नेले असावे. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—मध्यम, उंची—५ फुट १ इंच, केस—काळे व छोटे, अंगात—मोरपंखी रंगाची कुर्ती व निळा जिन्स घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.




सौ. कविता श्रीमती स्वाती

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी/साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. २रे अति. मुख्य न्याय दंडाधिकारी, रुम क्र. ०६, नागपुर. | ३२३४४३/२०१३ | कलम १३८ एनआय ॲक्ट | मनिष कृष्णराव रोकडे, रा. इतवारी, मस्कासाथ रेल्वे पुलाजवळ, नागपुर. | २८.०९.२०२६ |
| २ | मा. २० वे सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०२८८४/२००८ | कलम ३८४, ३८५, ४२७, ५०६ब, ३४ भा.दं.वि. | १) विनोद धनराज गिरी, वय २१ वर्ष, रा. गंगाजमुना वस्ती, कार्पो—रेशन शाळा, सायकल स्टॅन्ड जवळ, २) अमोल फरारी, रा. गंगाजमुना वस्ती, विमलाबाईचे घरी, लकडगंज. | १९.१०.२०२६ |
| ३ | मा. २० वे सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०५०३८८/२००५ | कलम ४,२५ भाहका | टिंकु उर्फ बंटी वसंतराव सतनामी, वय २१ वर्षे, रा. गंगा जमुना वस्ती, गोटाफोडे सावजीचे बिल्डींगमध्ये किरायाने, लकडगंज, नागपूर. | १३.१०.२०२६ |

**स्वा/—**

**( नितीन चुलपार )**

**सहा.पोलीस निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**